नि.फौ.ख.क्र.१७८/२०१४
सरकार वि. निलेश
निशाणी क्र.०६

**फौजदारी प्रकिंया संहितेचे कलम २९९ प्रमाणे साक्षीदाराची साक्ष**

**सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नाव – मायकल अँथनी डेनिअल

वय – ६३ वर्ष, व्यवसाय – सेवानिवृत्त

राहणार – भिलगाव, कामठी, जि. नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. पंचारीया यांच्यातर्फे**

१. दिनांक ११.१२.२००९ रोजी मी पोलीस हवालदार म्हणून कामठी पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्या दिवशी मी इतर स्टाफसह फरार आरोपीचा शोध घेण्याकरीता कामठी परिसरात फिरत होतो. दुर्गा चौक येथे पोहोचल्यानंतर आम्हाला लोकांकडून माहिती मिळाली की एक इसम हातात शस्त्र घेवून अब्दुलशा दर्गाजवळ धुमधाम करीत आहे. आम्ही अब्दुलशा दर्गाजवळ पोहोचलो असता आरोपी आम्हाला शिवीगाळ केली व तेथून पळू लागला. आम्ही त्याचा पाठलाग करून घेराव घालून त्याला पकडले, त्याच्या ताब्यातून पंचासमक्ष गुप्ती काढून घेतली. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव निलेश दिलीप रामटेके रा. अब्दुशा दर्गा असे सांगितले. त्यानंतर पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा करून गुप्ती जप्त केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविला. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तसेच त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.०७** देण्यात येत आहे. त्यानंतर आरोपीला पोलीस स्टेशनला नेवून त्याचे विरुध्द प्रस्तुतचा गुन्हा दाखल केला. आता मला छापील फिर्याद दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.०८** देण्यात येत आहे. त्यानंतर आरोपीला अटक पंचनाम्यानुसार अटक केली. आता मला अटक पंचनामा दाखविला. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.०९** देण्यात येत आहे. आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण**

**प्रस्तुतच्या खटल्यात आरोपी फरारी असल्यामुळे आरोपीच्या अनुपस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ प्रमाणे साक्ष नोंदविण्यात आलेली आहे. त्यामुळे, आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Digitally signed by RAJESH RAMESHRAO SHEREKAR
Date: 2025.11.14 16:43:45 +0530

**(रा.र. शेरेकर)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.२, कामठी.

ठिकाण –कामठी
दिनांक –१४/११/२०२५